# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **पशुसंवर्धन** : "महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **इतर मागास बहुजन कल्याण** : "वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे तेहेतीसावा, चौतीसावा, पस्तीसावा व छत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**[गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ व शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने (अनुक्रमांक १ व २)]:-**

(१) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १० वर आपत्ती व्यवस्थापन मंत्री निवेदन करतील :-**

शहानूर नदीच्या काठावरील मौजे विहिगांव, जि.अमरावती येथील घरांना पुराच्या व भुस्खलनाच्या धोक्यापासून संरक्षण देणेबाबत.

(२) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर मराठी भाषा मंत्री निवेदन करतील :-**

केंद्र सरकारने मराठी भाषेला दिलेला “अभिजात दर्जा” कागदावर असल्याबाबत.

**[शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने (अनुक्रमांक ३ ते ७)] :-**

**(३) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर वने मंत्री निवेदन करतील :-**

ट्रांझिट ट्रीटमेन्ट सेंटर, बचाव पथक यांना लागणाऱ्या साहित्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

**(४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १५ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

NCERT च्या पाठ्यपुस्तकातून 'मराठा साम्राज्याचा नकाशा' वगळल्याबाबत.

**(५) श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १९ वर पणन मंत्री निवेदन करतील :-**

नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील कांदा व मका उत्पादक शेतकऱ्यांनी चांदवड कृषि उत्पन्न बाजार समिती येथे आमरण उपोषण सुरु केल्याबाबत.

**(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १७ वर कामगार मंत्री निवेदन करतील :-**

केंद्र सरकारच्या कामगार व शेतकरी धोरणाविरोधात राज्यातील कामगारांनी राज्यव्यापी संप केल्याबाबत.

**(७) श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

वर्धा जिल्ह्यातील सिंदी (रेल्वे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करण्याबाबत.

**(८) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ७ वर परिवहन मंत्री निवेदन करतील :-**

मुंबई आणि आसपासच्या भागात सद्य:स्थितीत सुरू असलेल्या बेकायदा पेट्रोल बाईक टॅक्सीवर अंकुश ठेवण्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१) व (२)] —**

(१) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"अकोला महानगरपालिकेमध्ये मालमत्ता सर्वेक्षणाच्या नावाखाली सुरु असलेल्या दादागिरीने महानगरपालिकेने बेकायदेशीररित्या कंत्राटे देण्यात आली असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, महानगरपालिकेने दिलेली सदरची कंत्राटे व त्यांच्यामार्फत नेमलेल्या संबंधित कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी, नागरिकांच्या घरात घुसून महिलांना धमकावणे, फोटो काढणे आणि मानसिक छळ करण्यात येत असल्याचे त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, त्याप्रकरणी तेथील सामाजिक कार्यकर्ते यांनी विभागीय आयुक्त, नगरविकास विभाग,मंत्रालय आणि पोलिस विभागाकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास तक्रार केलेली असणे, सदर तक्रारीमध्ये कंत्राटदारामागील राजकीय सूत्रधार आणि त्याच बरोबर दोषी अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला असणे, परिणामी, सामाजिक कार्यकर्ते तसेच जनतेकडून देण्यात आलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शैक्षणिक संस्थेला दरवर्षी अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे लागत असणे, प्रत्येक कोर्सच्या परवानगी करीता आवश्यक असलेल्या कागदपत्रांसोबत अग्निशमन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणे, प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या इमारतीमध्ये अग्निशमन दलाच्या नियमाप्रमाणे सदर संस्थेला पाईपलाईन करणे, पाण्याची टाकी उभारणे त्यावरील पंप तसेच अग्निशमन दलाच्या गाडीकरता पॉईंट करणे, या सर्व सुविधा स्वखर्चाने कराव्या लागत असून हे सर्व करण्याकरिता लाखो रुपयांचा खर्च येत असणे, ते केल्यानंतर ना-हरकत प्रमाणपत्र घेत असताना सदर बिल्डिंगच्या चटई क्षेत्रानुसार प्रति चौ.मी. प्रमाणे आरसीसी विखुरलेले व अर्ध पक्के अशा शासनाने ठरविलेल्या दरानुसार सेवा फी आकारली जात असणे, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनायाच्या दिनांक १ एप्रिल, २०२५ च्या परिपत्रकानुसार सेवा फी भरावी लागणे, सदरची फी ही लाखो रुपयांमध्ये

असल्याने व ना-हरकत प्रमाणपत्र घेतेवेळी वेगळे चार्जेस भरावे लागत असल्याने शैक्षणिक संस्थांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून यामधून शैक्षणिक संस्थांना इतर व्यवसायिक आस्थापनेप्रमाणे गृहीत न धरता शैक्षणिक संस्थेच्या इमारतींना सूट देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **सर्वश्री दादाराव केचे,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, इद्रिस नायकवडी, पंकज भुजबळ, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वर्धा जिल्ह्यातील आर्वी येथे मोठ्या प्रमाणात एमडी, गांजा, दारू, गुटखा, सट्टा व वेश्या व्यवसाय असे अवैध धंदे होत असणे, आर्वी येथे दररोज लाखाहून अधिक किंमतीच्या अंमली पदार्थाची तस्करी, पुरवठा आणि विक्री होत असणे, आर्वी येथील तळेगाव मार्गावरील काही हॉटेल्स व मॉलमध्ये मोठ्या प्रमाणात वेश्या व्यवसाय होत असणे, याच माध्यमातून आर्वी येथे माफिया व पोलिसांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू असणे, याबाबत पोलिसांना वारंवार सूचना करून सुद्धा कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नसणे, परिणामी आर्वी येथे दररोज चार-पाच दिवसा नंतर खूनाचे प्रकार होत असणे, स्थानिक उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक यांना वारंवार सूचना करूनही स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची दखल न घेता कारवाई होत नसणे, अवैध धंदे करणाऱ्यांचे मनोबल वाढल्याने गुंड, दलाल यांचे प्रमाण वाढत जाणे, खुलेआम राजरोसपणे अवैध धंदे करणाऱ्या माफियांवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, याबाबत तातडीने गुन्हे दाखल करून व गुन्हे दाखल असलेल्यांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची आवश्यकता असताना सुद्धा पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने शासनाप्रती जनसामान्यांमध्ये आक्रोश व असंतोषाची भावना निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४)** **श्री.श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ अद्यापही कार्यान्वित नसणे, कोरोना नंतर वृत्तपत्र क्षेत्र अडचणीत आले असल्याने पत्रकारांपासून ते वृत्तपत्र विक्रेत्या लोकांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण झालेला असणे, सरकारच्या बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने असलेल्या पेन्शन योजनेचे प्रस्ताव सहा महिन्याच्या आत निकाली काढण्याची आवश्यकता, वर्तमानपत्र खरेदी करणाऱ्या वाचकांना आयकरातून सूट देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला सादर करणे, पत्रकारांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी महामंडळातर्फे मदतीची आवश्यकता, दरवर्षी पत्रकारांची माहिती व

जनसंपर्क विभागामार्फत गणना होण्याची आवश्यकता असणे, गृहनिर्माण योजने अंतर्गत मुंबईत पत्रकारांना जशी घरे देण्यात येतात तशी योजना महाराष्ट्रात सर्व ठिकाणी राबवण्याची आवश्यकता असणे, लघु वृत्तपत्रकारांना लघु उद्योजकांचा दर्जा देऊन त्यांना वीज बिलात, वेगवेगळ्या टॅक्समध्ये सवलत देण्याची आवश्यकता असणे, जाहिरातीवर आकारण्यात येणारा जीएसटी रद्द करण्याच्या मागणीचा सरकारने विचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नंदुरबार जिल्ह्यातील (मौजे. गंगापूर ता. नवापूर) जमीन संपादन प्रकरणात दिनांक ५ जुलै, २०२३ व दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी घोषित करण्यात आलेल्या मूळ निवाड्यात जमीन मालक असलेल्या अनुसूचित जमातीच्या व्यक्तींची नावे नमूद असणे, अंतिम निवाडा घोषित झाल्यानंतर जमीन मालकांच्या नावामध्ये कोणताही फेरबदल करणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य नसणे, तसेच अनुसूचित जमातीच्या जमीन धारकांच्या हक्कांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक असताना, सहायक जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी प्रधान सचिव, मुंबई यांच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०२४ व दिनांक १३ जानेवारी, २०२६ च्या आदेशांचा संदर्भ देत मूळ जमीन मालकांच्या ऐवजी बिगर अनुसूचित जमातीच्या व्यक्तींची नावे फेरनिवाड्यात अनधिकृतरीत्या समाविष्ट केल्याचे दिसून येणे, तसेच मूळ रूपये ८,१०,०५,१५८/- इतक्या मोबदल्याचा निवाडा थेट रूपये १५९,७५,९४,६२२/- इतका प्रचंड वाढविण्यात येणे, याबाबत आवश्यक ती खबरदारी न घेण्यात येणे, तसेच संबंधित अनुसूचित जमातीच्या जमीन मालकांनी शासनाची पूर्वपरवानगी न घेतल्याने त्यांची हरकत फेटाळण्यात आलेली असतानाही बिगर अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या नावाने निवाडा पारित होणे ही गंभीर बाब असून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची शक्यता, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.शिवाजीराव गर्जे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अहिल्यानगर जिल्ह्यातील वन कामगार सेवेत कायम होण्याकरिता अनेक आंदोलने करुन, शासनाला वेगवेगळी निवेदने देऊन शासनाकडून वन कामगारांना अद्याप कायमस्वरुपी नोकरीत सामावून न घेतल्यामुळे त्यांची झालेली फसवणूक, वन कामगार शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, १९९६ व दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ नुसार सेवेत कायम करून वन कामगारांचे फायदे व दर्जा मिळण्यास पात्र होणे, परंतु उप वनसंरक्षक, अहिल्यानगर यांनी चुकीच्या पध्दतीने काही कामाचे दिवस रोजगार हमी खाली दाखवल्यामुळे शासन

निर्णयाप्रमाणे कामगार सेवेत कायम न होणे, सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने वन कामगारांनी अहिल्यानगर औद्योगिक न्यायालयात तक्रारी दाखल करणे, कामगारांच्या बाजूने निकाल देऊन तक्रारी मंजूर केल्या, त्याविरुध्द शासनाने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे याचिका क्र. २९१६/२००८ व इतर १४ याचिका दाखल असणे, या सर्व याचिकांवर मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, १९९६ व दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ प्रमाणे शासनास दिनांक ३० फेब्रुवारी, २०२० रोजी कायम कामगारांचे फायदे व दर्जा देऊन आर्थिक लाभ देण्याचे आदेश करणे, परंतु शासनाने आजतागायत कोणतीच कार्यवाही केलेली नसणे, परिणामी वन कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण लक्षात घेता अहिल्यानगर जिल्ह्यातील ४०० वन कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा विचार करून शासनाने त्यांना कायमस्वरुपी शासन सेवेत समाविष्ट करण्याबाबत तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(७) **सर्वश्री जयंत आसगावकर,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, सर्वश्री. सदाशिव खोत, ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. संजय केणेकर, अरुण लाड, अमित गोरखे, किरण सरनाईक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बहुजन समाजातील गोरगरीब, गरजू मुला-मुलींना शिक्षण मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या राज्यातील बहुतांश मराठी शाळा आज पटसंख्येअभावी बंद पडण्याच्या मार्गावर असणे, शासनाने या शाळा टिकविण्याऐवजी रोज नवनवीन आदेश (जीआर) काढून शिक्षकांसह पालकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण करणे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून अलीकडेच म्हणजे दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी नवीन शिक्षक संचमान्यतेचा अध्यादेश काढणे, नव्या संच मान्यतेनुसार २० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळेवर शून्य शिक्षक तर काही शाळेवर एक शिक्षक अशी स्थिती निर्माण होणे, तसेच या नव्या धोरणामुळे हजारो शिक्षक अतिरिक्त होणार असून शेकडो शाळांचे भवितव्य धोक्यात येणे, नवीन संच मान्यतेनुसार विचार केल्यास शिक्षकांचा कामाचा ताण वाढणे, शिवाय त्या-त्या विषयातील तज्ञ शिक्षक देखील उपलब्ध न होणे, वर्ग ६ ते ८ किंवा वर्ग ९ ते १० यातील कोणत्याही तुकडीत वीस पेक्षा एकही विद्यार्थी कमी झाल्यास त्या स्तरावरील सर्व शिक्षक अतिरिक्त होत असणे, यामुळे शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त झालेले असणे, ज्या शाळेतील शिक्षकांची पदसंख्या शून्य झालेली आहे तेथील सध्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असणे, यापेक्षा गंभीर बाब म्हणजे या निर्णयामुळे वाडयावस्ती व डोंगराळ भागातील अनेक शाळा बंद पडणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात

तब्बल ३८ शाळा बंद झाल्या असून आणखी काही शाळा बंद होण्याच्या मार्गावर असणे, राज्य शासनाच्या संच मान्यतेच्या नियमानुसार आधार अपडेट नसल्याने अनेक विद्यार्थी संचमान्यतेत दर्शविण्यात न येणे, विद्यार्थी स्थानिक स्तरावर शिक्षणापासून अलिप्त राहणे, ज्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन त्यांचे भविष्य अंधारमय होणे, त्यामुळे मराठी शाळा टिकण्यासाठी नवीन शिक्षक संचमान्यतेच्या आदेशात सुधारणा करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानपरिषद नियमांतील नियम २२८ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे, ती स्थगित करण्यात यावी."

**सात : सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस)**

**आठ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

**सर्वश्री विक्रांत पाटील, प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"पनवेल क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पुनर्विकास तसेच विविध विकास प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टी धारकांच्या निवाऱ्यासाठी MMRDA रेंटल हाऊसिंग योजनेतील घरे मिळण्याकरिता पनवेल महानगरपालिकेकडून नगरविकास विभागाकडे दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी मागणी करण्यात आलेली असणे, बालाजी सिम्फोनी (सुकापूर), मॅरेथॉन (पळस्पे) या रेंटल प्रकल्पातील शासकीय कोट्यातील ७८९१ घरे तसेच रोहिंजन येथील अधिराज, सुप्रीम-५ व ब्यु सर्कल या रेंटल हाऊसिंग प्रकल्पातील शासकीय कोट्यातील ३२१- घरे अशी एकूण १११०९ घरांची संख्या असणे, MMRDA कडून सदरची घरे गिरणी कामगारांसाठी देणे प्रस्तावित असल्याचे सांगण्यात येणे, परंतु गेल्या ८ वर्षात प्रत्यक्षात कोणतीही प्रक्रिया पूर्ण केलेली नसणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना ५०% घरे देण्याच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदरची ५०% घरे शासनाकडून पनवेल महानगरपालिकेला देणे, पनवेल महानगरपालिकेकडून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत झोपडपट्टी-पुनर्वसनाच्या कामासाठी सिडकोकडे पूर्वाश्रमीच्या-ग्रामपंचायत कळंबोली हद्दीतील सर्व्हे क्र.५३ या भूखंडाची मागणी केलेली असणे, भूखंडाचा वापर हा झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता

करण्याचा पनवेल महानगरपालिकेचा चांगला हेतू असणे, या भूखंडावरती त्यावेळी PMAY प्रकल्प मंजूर झालेला असणे, सिडकोकडून या प्रकल्पासाठी सर्व्हे नं. ३३ ही जागा प्रस्तावित केलेली असणे, सदर भूखंडाकरिता रुपये ३१ कोटी २३ लक्ष ३३ हजार ८८२ एवढी रक्कम दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजी पनवेल महानगरपालिकेकडून भरणा करून घेतलेली असणे, सिडकोने सर्व्हे नं.५९ हा भूखंड पनवेल महानगरपालिकेला देण्याचे कबूल करणे, परंतु सन २०२३ पासून १४ वेळा पत्रव्यवहार करूनही भूखंडाची पूर्तता अजूनही केलेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**दहा : मा.सभापती यांचा प्रस्ताव ---**

"दिनांक ८ मार्च, २०२६ हा दिवस "आंतरराष्ट्रीय महिला दिन" म्हणून जागतिक स्तरावर साजरा करण्यात येणे, नारी शक्तीच्या प्रेरणास्थानी असलेल्या मा.आई जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या या पुण्यभूमीत महिला सक्षमीकरण व बळकटीकरणाच्या विविध कल्याणकारी योजना आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिला वर्गात आत्मविश्वास व आत्मनिर्भरता निर्माण करणे, ४ थ्या महिलाधोरणामध्ये विहित शाश्वत विकास व महिला सक्षमीकरण या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने प्रत्येक विभागासाठी कृती कार्यक्रम व त्यासाठी अपेक्षित विकास मोजमापाचे निर्देशांक निश्चित केलेले असणे, त्याच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून शासनाने आरोग्य, कायदा, बचतगट, सहकारी संस्था, महिला कामगार, महिला ऊसतोड कामगार, अत्याचार पीडीत महिला यांचेसाठी अनेक कार्यक्रम घेण्याची आवश्यकता, या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूद करणे, असंघटीत कामगार विशेषत: महिला कामगारांसाठी विशेष कार्यक्रमांची असलेली आवश्यकता, शासनाने शेतकरी व शेतमजूर महिलांसाठी तसेच महिला शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना, महाराष्ट्रात महिलांच्या सर्वसमावेशक आर्थिक सबलीकरणासाठी महिला बचत गट व महिला सहकारी संस्थांचे बळकटीकरण करणे, शहरी उपजिविका अभियानांद्वारे महिलांमधील कौशल्य व उद्योजकता वृध्दिंगत करणे व त्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, आदिवासी व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशिल क्षेत्रांमध्ये महिला वन कामगार, वनोत्पादकांचे संकलन, वननिवासी महिला निसर्ग पर्यटन तसेच वन व पर्यावरण संवर्धनात महिलांचा प्रभावी सहभाग व शाश्वत विकासाठी कृती कार्यक्रम राबविणे, किशोरवयीन मुलींना आरोग्य, पोषण, सुरक्षितता व स्वच्छतेबाबतचे प्रशिक्षण देणे, महिलांमध्ये डिजिटल साक्षरता तसेच ई-गव्हर्नन्स प्रणालीबाबत जागरुकता निर्माण करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचे क्षमतावर्धन करुन महिलांमधील नेतृत्वगुणांचा विकास करणे, लिंगसापेक्ष अर्थसंकल्पिय तरतूदींबाबत जागरुकता निर्माण करणे, स्त्री-पुरुष समानतेप्रती अर्थधोरण राबविणे, महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रभावी कायदे तयार करुन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, महिलांमध्ये डिजीटल व्यवहार व सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करुन डिजीटल प्रणालीमध्ये महिलांचा सहभाग

वाढविण्याच्यादृष्टीने प्रशिक्षण देणे, कौटुंबिक हिंसाचार व अत्याचारग्रस्त महिलांचे सक्षमीकरण, समुपदेशन व पुनर्वसन करणे, महिलांसाठी दुग्धव्यवसाय पतसंस्था, हस्तकला, स्वयंसहायता गट, महिला बचत गट, महिलांसाठी अनुरुप शहरी कौशल्य केंद्रे, महिला उद्योजकांसाठी सार्वजनिक-खाजगी-भागिदारी उपलब्ध करुन देणे, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला, महिला कामगार यांचे सक्षमीकरण करणे, महिला विकासाच्या अनुषंगाने प्रत्येक विभागाने विभागनिहाय कृती कार्यक्रम जाहिर करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची अपेक्षा विचारात घेता यासंदर्भात शासनाने करावयाची उपाययोजना."

**अकरा : (गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा व मंत्र्यांचे उत्तर)**

**श्री. सतेज पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील नगरपालिका, महानगरपालिकेचा कारभार प्रशासनामार्फत गेले अनेक वर्ष चालविल्यामुळे वाढलेला गैरव्यवहार व नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत ८१ हजार ४४९ कोटी ३२ लाख रूपयांच्या ठेवी मोडून त्यापैकी ३६ हजार ६२३ कोटी रुपये विविध प्रकल्पांसाठी वापरण्यांचे निश्चित केल्याने त्यामध्ये झालेली अनियमितता, मुंबईची सर्वसामान्यांची लाईफलाईन असलेली बेस्ट बंद करण्याचा डाव असणे, विविध मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार, एमएमआरडीए तसेच सिडको या प्राधिकरणांमध्ये वाढलेला गैरव्यवहार, त्यामुळे त्यांची ढासळलेली आर्थिक स्थिती, विविध शहरांचे विकास आराखडे व हद्दवाढीचे प्रस्ताव रखडणे, मिठी नदी स्वच्छता व गाळ काढणे या निविदेत झालेली अनियमितता, तसेच नागपूर महानगरपालिकेत कंपोस्ट डेपो, रिंग रेल्वे, डम्पिंग यार्ड, इत्यादी कामात झालेली अनियमितता, एसटीपी प्रकल्प नसल्याने पाणी निचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, मोठया प्रमाणात उड्डाण पूल तयार होऊनही वाहतूक कोंडी निर्माण होणे, तसेच निधी अभावी दुरुस्तीची कामे रखडलेली असणे, गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी न होणे, एसआरए अंतर्गत झालेला भ्रष्टाचार, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीचे धोरण निश्चित करणे, म्हाडाच्या लॉटरीमध्ये झालेला गैरव्यवहार, गिरणी माथाडी व सफाई कामगार व पोलीस कर्मचारी यांना हक्काची घरे प्राप्त न होणे, केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपडपट्टी व इमारतीबाबत धोरण ठरविणे, सार्वजनिक बांधकाम अंतर्गत राज्य महामार्ग व इतर रस्त्यांची तसेच अन्य कामे निधी अभावी रखडली असून ठेकेदारांना पुरेसा व वेळेवर निधी मिळत नसल्याने रस्त्याचा दर्जा निकृष्ट असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

**बारा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"उजनी धरण हे राज्यातील एक महत्वाचे व विस्तीर्ण जलाशय असून पर्यटकांना गोड्या पाण्याचा समुद्र अनुभवण्याची संधी मिळत असणे, दरवर्षी येणाऱ्या विदेशी पक्ष्यांमुळे सदर ठिकाण पक्षी निरीक्षणासाठी विशेष प्रसिद्ध असणे, त्यामुळे इको-टुरिझम, बर्ड वॉचिंग, तसेच जलक्रीडा पर्यटन इ.बाबींचा विकास होऊ शकणे, त्या अनुषंगाने जलपर्यटन केंद्र, बोट क्लब, वॉटर स्पोर्ट्स सुविधा, देशातील सर्वात मोठा जलतरण तलाव, धार्मिक पर्यटनासाठी सुविधा विकास, कृषी व विनयार्ड पर्यटनासाठी मार्गदर्शक केंद्रे, निवास व्यवस्था यासाठी रुपये २८२ कोटी एवढ्या रक्कमेचा उजनी एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प आराखडा शासनाने मंजूर केला असणे, सदर प्रकल्पासाठी सन २०२७ पर्यंतची मुदत निश्चित करण्यात येणे, तरी प्रत्यक्षात अंमलबजावणीस गती मिळालेली नसणे, उजनी जलाशय व परिसरातील काही जमिनींवर कृष्णा खोरे विकास महामंडळ यांनी करारासाठी हक्क सांगितल्याने जलपर्यटन केंद्रासाठी बोट खरेदीची निविदा रद्द करण्यात येणे, परिणामी पर्यटन प्रकल्पांचा विकास थांबला असून स्थानिक व्यावसायिक, युवक व नागरिकांमध्ये नाराजी निर्माण होणे, उजनी धरण येथे जल, कृषी, धार्मिक व विनयार्ड पर्यटन यांच्या एकत्रित स्वरूपामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती, लघुउद्योगांना चालना, तसेच जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला मोठी मदत होणार असून उजनी एकात्मिक पर्यटन प्रकल्पास गती देण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून प्रशासकीय अडथळे दूर करून निश्चित वेळेत उक्त प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपायोजना."

(२) **सर्वश्री अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, अशोक जगताप, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित** करतील.

"नागपूर येथील कोराडी औष्णिक वीज केंद्रात ६६० मेगावॅट क्षमतेचे युनिट क्रमांक ८, ९, १० असे तीन युनिट सन २०१० ते २०१७ या कालावधीत उभारले असणे, या प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयांने दिनांक ४ जानेवारी, २०१० रोजी पर्यावरणीय मान्यता दिली असणे, परंतु या प्रकल्पासाठी केंद्रीय वने व हवामान बदल पर्यावरण मंत्रालयाने मंजूरी देताना विनिर्दिष्ट केलेल्या अटींचे पालन करण्यात महाजेनको अपयशी ठरणे, तसेच कोराडी प्रकल्पाला वातावरणातील हवेची गुणवत्ता राखण्यात अपयश आले असणे, १०० टक्के फ्लाय ॲश वापराचे उल्लंघन होणे, राख साठवण तलावात

फ्लाय अ‍ॅश योग्यप्रकारे व्यवस्थापित न करणे, पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या गंभीर कृत्यांमुळे राष्ट्रीय हरीत लवादाने महाजेनकोला ५ कोटी रूपयांचा दंड ठोठावला असणे महाजेनकोच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण वाढल्यामुळे नागपूरातील हवेची गुणवत्ता खराब होऊन मानवी जीवनावर आरोग्य विषयक गंभीर परिणाम होणे याकरिता शासनाकडून करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ६ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.